# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date – 16 October 2026
# Time 01.00 to 01.05 PM
# Language Marathi
# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
# प्रादेशिक बातम्या
# दिनांक १६ ऑक्टोबर २०२६ दुपारी १.०० वा.

****

जागतिक अन्न दिनानिमित्त केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी, अन्न हेच पूर्णब्रह्म असून ते साक्षात जीवनाचा आधार असल्याचं म्हटलं आहे. यानिमित्त समाज माध्यमावर जारी केलेल्या संदेशात त्यांनी, आपल्या आसपास कुणीही भुकेले राहणार नाही याची काळजी घेण्याचं आणि यासाठी एकत्रित संकल्प करण्याचं आवाहन केलं. १९४५ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या 'अन्न आणि कृषी संघटनेची' स्थापना झाल्याच्या स्मरणार्थ दरवर्षी १६ ऑक्टोबर रोजी जागतिक अन्न दिन साजरा केला जातो. "आजचे नवसंशोधन, उद्याचे पोषण" ही यंदाच्या जागतिक अन्न दिनाची मध्यवर्ती संकल्पना आहे.

****

केंद्रीय गृह मंत्री अमित शाह यांनी राष्ट्रीय सुरक्षा गार्ड – एनएसजी च्या स्थापना दिनाच्या औचित्याने शुभेच्छा दिल्या आहेत. NSG ने देशावरच्या प्रत्येक दहशतवादी हल्ल्याला प्रत्यूत्तर दिलं, त्यांनी धैर्य आणि शौर्यपूर्ण बलिदानाच्या जोरावर राष्ट्राचं रक्षण केल्याचं शहा यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

****

केंद्र सरकारने या पंधरवड्यासाठी पेट्रोल, डिझेल आणि विमानासाठी लागणारं इंधन –एटीएफ च्या निर्यातीवर लागणाऱ्या संशोधित शुल्कासाठीची अधिसूचना जारी केली आहे. अर्थ मंत्रालयाने जारी केलेल्या या अधिसूचनेनुसार, पेट्रोल निर्यातीवर प्रतिलीटर अडीच रुपये, डीझेलच्या निर्यातीवर प्रतिलीटर साडे आठ रुपये तर एटीएफच्या निर्यातीवर प्रतिलीटर साडे दहा रुपये शुल्क आकारण्यात येईल. घरगुती वापरासाठी उपलब्ध पेट्रोल आणि डिझेलवर आकारण्यात येणाऱ्या सध्याच्या

शुल्कात कोणतीही वाढ करण्यात येणार नसल्याचं स्पष्ट करण्यात आलं असून, ही अधिसूचना आजपासून लागू झाली.

****

सायबर फसवणूक आणि स्पॅम कॉल्स रोखण्यासाठी केंद्र सरकारने पुढील महिन्यापासून सर्व टेलिकॉम कंपन्यांना 'कॉलर नेम प्रेझेंटेशन' सेवा अनिवार्य केली आहे. यामुळे बँकिंगशी संबंधित फसवणूक, घोटाळे आणि खोटे फोन करणाऱ्यांची खरी नावं समोर येऊन सायबर फसवणुकीला आळा बसण्यास मदत होईल. सध्या या सुविधेअंतर्गत केवळ फोन नंबरच प्रदर्शित होतो. भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरणानुसार या सेवेअंतर्गत कोणत्याही अनोळखी क्रमांकावरुन फोन आल्यास, फोन करणाऱ्याचं नाव हे त्याच्या केवायसी नोंदीनुसार आपल्या मोबाईल स्क्रीनवर दिसेल. त्यासाठी आपल्याला इतर कोणतंही ॲप डाऊनलोड करण्याची आवश्यकता राहणार नाही.

****

रेल्वे प्रवाशांना देण्यात येणारं जेवण उच्च दर्जाची सुरक्षा आणि आरोग्य नियमानुसार असावं यासाठी भारतीय रेल्वे आणि खानपान महामंडळ – IRCTC नं भारतीय गुणवत्ता परिषदेशी एक सामंजस्य करार केला आहे. याअंतर्गत भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाच्या नियमांचं आणि आंतरराष्ट्रीय मानकांचं कठोर पालक करण्यासाठी प्रमाणित व्यावसायिकांना रुजू करणार आहे. हे तज्ज्ञ तिमाही आणि सहामाही स्तरावर अचानक भेट देऊन रेल्वेच्या पाकगृहांची तपासणी करतील. यामुळे जेवणाचा दर्जा उत्तम राहण्यास मदत होईल, असं रेल्वे विभागानं म्हटलं आहे.

****

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते आज मुंबईत 'सुजाण नागरिक–सक्षम भारत' या अभिनव शैक्षणिक उपक्रमाचं उद्धाटन होणार आहे. 'स्मार्ट नागरिक' आणि 'विद्यार्थी प्रेरणा'या पुस्तिकेचं प्रकाशनही यावेळी करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री फडणवीस आणि भूषण गवई यावेळी शाळेतल्या विद्यार्थ्यांचा वर्ग देखील घेणार आहेत.

****

केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले मराठवाड्यात दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी आज छत्रपती संभाजीनगर इथं दाखल झाले. यावेळी पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी, नदीजोड प्रकल्प राबवल्यास भविष्यात दुष्काळी परिस्थिती उद्भवणार नाही, असं मत व्यक्त केलं. जनावरांसाठी चारा आणि राज्य सरकारने जाहीर केलेली शेतकऱ्यांना मदत या दोन्ही रक्कमेत वाढ करण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचं आठवले यांनी सांगितलं.

****

नांदेड जिल्ह्यात झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला. माहूर इथं दर्शनासाठी आलेल्या भाविकांचा टेम्पो किरोळी घाटात उलटल्यानं तीन भाविक ठार झाले, तर तीन जण जखमी झाले. सर्व भाविक यवतमाळ जिल्ह्यातले असल्याची प्राथमिक माहिती आहे. अन्य एका अपघातात कंधार तालुक्यातल्या बहाद्दरपुरा इथं एक कार मन्याड नदीत कोसळून एकाचा मृत्यू झाला.

****

नंदुरबार जिल्ह्यातल्या नवापूर इथं बर्ड फ्लूमुळे मोठं आर्थिक नुकसान झालेल्या पोल्ट्री व्यावसायिकांना शासनाकडून नुकसान भरपाईपोटी ६ कोटी ७२ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. बर्ड फ्लूच्या प्रादुर्भावामुळे १४ पोल्ट्री फार्ममधल्या चार लाख सहा हजार ६८२ कोंबड्यांचं कलिंग करण्यात आलं होतं, तर दोन लाख ४९ हजार ७२३ अंडी आणि पाच लाख ४८ हजार किलोग्रॅम खाद्य नष्ट करण्यात आलं होतं. आतापर्यंत नुकसान भरपाईची ६० टक्के रक्कम वितरित करण्यात आली असून, उर्वरित रक्कम लवकरच वितरित करण्यात येणार आहे.

****